MHRT030019992019

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | -- | २१/०९/२०१९ |
| नोंदणी तारीख | -- | २१/०९/२०१९ |
| निकाल तारीख | -- | १०/०६/२०२६ |
| कालावधी | -- | वर्षे महिने दिवस<br>०६ ०८ २० |

# रत्नागिरी येथील मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात

(पीठासीन अधिकारी श्रीम.एस.एस.पिंगळे यांचेसमोर)

**न्यायनिर्णय दिनांकः – १०/०६/२०२६**

**नियमित फौजदारी खटला क्रमांक १५३/२०१९**

**निशाणी ८१**

रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाणे गु.र.क्र.३७/२०१९

**फियादी/सरकार पक्षः** **महाराष्ट्र सरकार** तर्फे पोलीस ठाणे अधिकारी,
रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाणे, ता. जि. रत्नागिरी.

**सरकार पक्षातर्फेः** सहा.सरकारी अभियोक्ता श्री.पी.ए.सावंत.

**आरोपीः**

१. **रामचंद्र कानू मोहिते,**
वय सु. – ७२ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त,
रा. वेळवंड, बौद्धवाडी, ता. जि. रत्नागिरी

**आरोपीतर्फे वकीलः** श्री.एस.आर.जाधव

२. **किरण रामचंद्र मोहिते,**
वय सु. – ३८ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
रा. वेळवंड, बौद्धवाडी, ता. जि. रत्नागिरी

**आरोपीतर्फे वकीलः** श्री.एस.आर.जाधव

**३. सुरज रामचंद्र मोहिते,**
वय सु. – ३४ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
रा. वेळवंड, बौद्धवाडी, ता. जि. रत्नागिरी

**आरोपीतर्फे वकीलः** श्री.एस.आर.जाधव

**४. राजश्री रामचंद्र मोहिते,**
वय सु. – ६९ वर्षे, व्यवसाय – घरकाम,
रा. वेळवंड, बौद्धवाडी, ता. जि. रत्नागिरी

**आरोपीतर्फे वकीलः** श्री.एस.आर.जाधव

| | |
|---|---|
| गुन्हा तारीख | ०८/०३/२०१९ |
| पहिली खबर तारीख | ०८/०३/२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २१/०९/२०१९ |
| दोषारोप निश्चीतीची तारीख | ०९/०२/२०२१ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १२/०६/२०२३ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | १०/०६/२०२६ |
| शिक्षेची तारीख, लागू असल्यास | -- |

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर खुले केल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा | दिलेली शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ करीता संपरिक्षे दरम्यान निरुद्ध केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रामचंद्र कानू मोहिते | ०९/०३/२०१९ | ०९/०३/२०१९ | भा.दं.वि.क. ३२५, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ | निर्दोष मुक्त | -- | -- |
| २. | किरण रामचंद्र मोहिते | ०९/०३/२०१९ | ०९/०३/२०१९ | भा.दं.वि.क. ३२५, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ३. | सुरज रामचंद्र मोहिते | ०९/०३/२०१९ | ०९/०३/२०१९ | भा.दं.वि.क. ३२५, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ४. | राजश्री रामचंद्र मोहिते, | ०९/०३/२०१९ | ०९/०३/२०१९ | भा.दं.वि.क. ३२५, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ | निर्दोष मुक्त | -- | -- |

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | सनथ रविंद्र मोहिते | फिर्यादी | ३५ |
| २. | शैलेंद्र वसंत माईन | घटनास्थळ पंच | ३९ |
| ३. | मनिष शंकर मोहिते | साक्षीदार | ४६ |
| ४. | दामोदर सखाराम पांचाळ | साक्षीदार | ५० |
| ५. | रविंद्र कानू मोहिते | साक्षीदार | ५२ |
| ६. | डॉ.राहुल विलास देसले | वैद्यकीय अधिकारी | ६० |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | प्रदिप विष्णु कचरे | जप्ती पंच | ६५ |
| ८. | डॉ. राजश्री गजानन ढवळे | वैद्यकीय अधिकारी | ६८ |
| ९. | वैष्णवी विजय यादव | तपासी अधिकारी | ७० |

## बचाव पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| — | — | — | —— |

## न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| —— | —— | —— | —— |

## अभियोग पक्षातर्फे दाखल कागदपत्र

| अ.क्र. | कागदपत्रांचे वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | लेखी फिर्याद/स.सा.क्र.१ | पी–१ |
| २. | घटनास्थळ पंचनामा/स.सा.क्र.२ | ४० |
| ३. | हातनकाशा/स.सा.क्र.२ | ४१ |
| ४. | घटनास्थळांचे फोटो/स.सा.क्र.२ | ४२ ते ४४ |
| ५. | फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र/स.सा.क्र.६ | ६१ |
| ६. | फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र/स.सा.क्र.८ | ६९ |
| ७. | जप्ती पंचनामा/स.सा.क्र.९ | ७१ |
| ८. | मुद्देमाल पावती/स.सा.क्र.९ | ७२ |

| | | |
|---|---|---|
| ९. | भारतीय पुरावा कायदा कलम ६५ब प्रमाणपत्र/स.सा.क्र.९ | ७३ |
| १०. | घटनास्थळाचा ७/१२ उतारा/स.सा.क्र.९ | ७४ |
| ११. | घटनास्थळाचा गाव नमुना/स.सा.क्र.९ | ७५ |

## बचाव पक्षातर्फे मान्य केलेली कागदपत्र

| अ.क्र. | कागदपत्रांचे वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## बचाव पक्षातर्फे दाखल केलेली कागदपत्र

| अ.क्र. | कागदपत्रांचे वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## न्यायालयीन कागदोपत्री निशाण्यांची यादी

| अ.क्र. | कागदपत्रांचे वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | वस्तू क्र.१ | काठी |

.............................................

# न्यायनिर्णय

( खुल्या न्यायालयात जाहीर )

आरोपींच्या विरुद्ध भारतीय दंड विधान,१८६० चे कलम ३२५, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते.

२. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –

फिर्यादी–सनथ रविंद्र मोहिते हे त्यांचे वडिल–रविंद्र, आई–शालिनी, भाऊ–अक्षय, बहिण–श्रुतिका असे वेळवंड, बौध्दवाडी, ता.जि.रत्नागिरी येथे राहतात. सदर ठिकाणी त्यांची वडिलोपार्जित जमिन आहे व ती त्यांनी राखण्याकरीता निवळी गावातील वासुदेव सखाराम गावडे यांना दिलेली आहे व त्यांनी सदर जमिनीमध्ये काजू लागवड केलेली आहे. दिनांक ०८/०३/२०१९ रोजी सकाळी ७.०० वाजता फिर्यादी वडिलोपार्जित जमिनीमध्ये काजू काढण्याकरीता गेले व तेथून परत घरी येण्याकरीता निघाले असता, त्यांचा सख्खा चुलत भाऊ–सुरज रामचंद्र मोहिते व किरण रामचंद्र मोहिते तेथे आले व फिर्यादीस म्हणाले की, ''या जमिनीमध्ये तुम्ही कुणीच येण्याचे नाही''. यावरुन त्यांचेमध्ये शाब्दीक बाचाबाची झाली व सूरजने त्याचे हातातील बांबूचे काठीने फिर्यादीचे डोक्यावर मारणेचा प्रयत्न केला. फिर्यादीने बचावाकरीता उजवा हात वर केला असता, काठी फिर्यादीचे उजवे हाताचे करंगळीला लागून दुखापत झाली. त्याचवेळी रामचंद्र व राजश्री यांनी फिर्यादीस हाताचे ठोश्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली. सदरची वेळ सकाळी ९.०० वाजताची होती. त्यानंतर फिर्यादीने आरोपींचे विरुद्ध रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

३. त्या अनुषंगाने, रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.क्र.३७/२०१९ दाखल झाला. त्याचा पुढील तपास महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल श्रीमती व्ही.व्ही.यादव, ११४७ यांनी केला. तपासकामी त्यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला, घटनास्थळाचे फोटो

काढले, नकाशा काढला, वैद्यकीय प्रमाणपत्रे व गुन्हयाचे कामी आवश्यक कागदपत्रे प्राप्त करुन तपासकामी सामील केली, साक्षीदारांची टिपणे नोंदवली. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींचे विरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**४.** त्या अनुषंगाने, माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींचे विरुद्ध निशाणी १८ अन्वये, भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२५, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये दंडनीय अपराध केल्याबाबत दोषारोप विरचित केला. त्यामधील मजकूर आरोपींना वाचून आणि समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षा घेण्याचे सुचविले. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नि.क्र.७७ ते नि.क्र.८० येथे नोंदवण्यात आले.

**५.** माझ्यासमोर उपस्थित झालेले प्रश्न आणि त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत : –

| | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक ०८/०३/२०१९ रोजी सकाळी ९.०० वाजण्याचे सुमारास शिंदेवाडी ते निवळी गावडेवाडी जाणाऱ्या पायवाटेवर, वेळवंड, म्हारवडा, ता.जि. रत्नागिरी येथे आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुनर्सरनार्थ, फिर्यादीच्या उजव्या हाताच्या करंगळीवर बांबूच्या काठीने मारुन त्याला इच्छापूर्वक गंभीर दुखापत पोहोचवली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२५ सह ३४ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुनर्सरनार्थ, फिर्यादीच्या उजव्या हाताच्या करंगळीवर बांबूच्या काठीने की, जी गुन्ह्यात हत्यार म्हणुन वापरली तर मृत्यू येवू शकतो त्याने मारुन त्याला इच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४ सह ३४ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| ३. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुनर्सरनार्थ, फिर्यादीला हाताच्या थापटांनी मारुन त्याला इच्छापूर्वक साधी दुखापत पोहोचवली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२३ सह ३४ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| ४. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुनर्सरनार्थ फिर्यादीला त्याच्या हातून सार्वजनिक शांतता भंग व्हावी अगर त्यांच्या हातून अन्य कोणतातरी अपराध घडावा या उद्देशाने शिवीगाळ करुन त्याचा इच्छापूर्वक अपमान केला व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ५०४ सह ३४ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ५. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुनर्सरनार्थ फिर्यादीला ठार मारण्याची धमकी दिली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ५०६ सह ३४ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| ६. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमीमांसा

**प्रश्न क्रमांक १ ते ५ बाबत :–**

**६.** अभियोग पक्षातर्फे सनथ (स.सा.क्र.१) याने त्याच्या साक्षीमध्ये (नि.३५) असे कथन केले आहे की, तो वेळंवड, बौद्धवाडी येथे त्याचे वडिल रविंद्र, आई शालिनी, भाऊ अक्षय व बहिण श्रुतीका यांचेसह एकत्र कुटूंबात रहातो. त्या ठिकाणी त्याचे घर असून वडिलोपार्जित समाईक जागा आहे. सदर जागेत काजूची झाडे आहेत. दिनांक ०८/०३/२०१९ रोजी सकाळी ०७.०० वाजता तो त्याच्या वडिलोपार्जित समाईक जमिनीत काजू काढणेसाठी गेला होता. तो काजू काढून सकाळी ०९.०० वाजता घरी परत येण्यास निघाला त्यावेळी निवळी व गाववाडी याच्या पायवाटेवर आरोपींनी त्याला थांबवले व शिवीगाळ करत, ''या जमिनीवर तू व तुझ्या घरातील कोणीच यायचे नाही'', असे सांगितले. शिवीगाळ होत असताना त्यांच्या दरम्यान बाचाबाची झाली. त्यावेळी आरोपी सुरज आणि किरण यांनी त्याला धक्का मारुन खाली पाडले. आरोपी रामचंद्र, त्यांची पत्नी राजश्री यांनी त्याला मारहाण केली. त्यावेळी आरोपी रामचंद्र यांच्या हातात सुकी बांबूची काठी होती. त्यावेळी आरोपी सुरज याने त्याच्या हातातील काठी घेवून त्याच्या डोक्यात घालण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्याने त्याचा उजवा हात वर केला. त्यावेळी त्याच्या उजव्या हाताच्या करंगळीला दुखापत झाली. आरोपींनी त्याला हाताच्या ठोश्याने देखील मारहाण केली होती.

७. फिर्यादी–सनथ मोहिते (स.सा.क्र.१) याने आपल्या सरतपासणीत स्पष्ट नमूद केले आहे की, घटना घडत असताना त्या ठिकाणी काही गुराखी थांबलेले होते. मात्र, अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ९ तपास अधिकारी सहाय्यक फौजदार वैष्णवी यादव यांनी आपल्या उलटतपासणीत मान्य केले आहे की, गुन्ह्याचा तपास करत असताना घटनास्थळी वासुदेव गावडे (गुराखी) हजर असल्याचे निष्पन्न झाले होते, तरीही त्यांचा शोध घेऊन त्यांचे जबाब नोंदवण्यात आले नाहीत. असे न करण्याचे कोणतेही योग्य व संयुक्तिक कारण अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेले नाही. अभियोग पक्षाने कोणत्याही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराला तपासलेले नाही. अभियोग पक्षातर्फे तपासलेले अन्य साक्षीदार मनीष मोहिते, दामोदर पांचाळ व रवींद्र मोहिते अनुक्रमे साक्षीदार क्र. ३, ४ आणि ५ हे फिर्यादीचे जवळचे नातेवाईक किंवा एकाच गटातील असून, ते केवळ "ऐकीव" (Hearsay) साक्षीदार आहेत. स्वतंत्र साक्ष दडपल्यामुळे अभियोग पक्षाच्या प्रामाणिकतेवर कायदेशीर संशय निर्माण होतो. फिर्यादीच्या मुख्य साक्षीत आणि त्याच्या मूळ फिर्यादीत (नि.क्र.पी–१ ) कायदेशीररीत्या महत्त्वाच्या सुधारणा आढळून आल्या आहेत, ज्या आरोपीच्या बचावाला बळ देतात.

८. फिर्यादी–सनथ मोहिते (नि.क्र. ५२) याने उलटतपासणीत मान्य केले की, "आरोपी रामचंद्र व जयश्री यांनी त्याला मारहाण केली आणि रामचंद्रच्या हातात सुकी बांबूची काठी होती," हा मुख्य मजकूर त्याच्या लेखी फिर्यादीमध्ये का नमूद नाही, याचे कोणतेही संयुक्तिक कारण त्याला देता आले नाही. फिर्यादीचे वडील साक्षीदार क्र. ५ रवींद्र मोहिते यांच्या सांगण्यानुसार, घटना सकाळी ०९.०० ते ०९.३० च्या दरम्यान घडली. परंतु, फिर्यादीच्या मते, तो सकाळी ०९.०० वाजता जमिनीवरून निघून १०.०० वाजता घरी पोहोचला. हा वेळेतील फरक आणि त्याबाबत मूळ बयाणातील मौन खटल्याच्या सत्यतेवर प्रश्नचिन्ह उभे करते.

९. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १, ३, ४ आणि ५ अनुक्रमे सनथ मोहिते,

मनीष मोहिते, दामोदर पांचाळ व रवींद्र मोहिते या सर्वांनीच हे मान्य केले आहे की, आरोपी आणि फिर्यादी–सनथ मोहिते यांच्यात गेल्या ७ ते ८ वर्षांपासून सामाईक जमिनीवरून आणि काजूची झाडे काढण्यावरून तीव्र वाद सुरू आहेत. यापूर्वी तंटामुक्ती समितीकडे आणि पोलीस पाटील यांच्याकडे एकमेकांविरुद्ध तक्रारी झालेल्या आहेत. अशा परिस्थितीत, जमिनीच्या पूर्ववैमनस्यामुळे आरोपींना खोट्या खटल्यात अडकवण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही, विशेषतः जेव्हा इतर स्वतंत्र पुरावा उपलब्ध नसेल.

१०. अभियोग पक्षाचा असा आरोप आहे की, आरोपी सुरज याने बांबूच्या काठीने मारल्यामुळे फिर्यादीच्या उजव्या हाताच्या करंगळीला दुखापत झाली आणि पाचव्या मेटाकार्पल अस्थिभंग (Fracture) झाले. परंतु वैद्यकीय पुरावा या दाव्याला पूर्णपणे छेद देतो. त्यामुळे वैद्यकीय पुराव्यातील तफावत आणि विसंगती अभियोग पक्षाच्या कथानकावर संशय निर्माण करते.

११. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ डॉ.राहुल देसले यांनी स्पष्टपणे कबूल केले की, अस्थिभंगाचे (Fracture) अचूक निदान एक्स–रे काढल्याशिवाय होऊ शकत नाही आणि त्यांनी स्वतः रुग्णाचा एक्स–रे काढलेला नव्हता. फिर्यादीने एक्स–रे पोलिसांना दिल्याचा दावा केला असला, तरी तपास अधिकाऱ्यांनी तो न्यायालयात सादर केलेला नाही. एक्स–रे चा अभाव असल्यामुळे दुखापतीवर पूर्णपणे प्रकाश पडत नाही. शिवाय सदरची जखम ४८ तासात झाली असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. याचाच अर्थ, वैद्यकीय तपासणीच्या आधीच्या ४८ तासात तथाकथित घटनेव्यतिरिक्त इतरही कुठल्या प्रसंगात जखमीला इजा झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

१२. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ८ डॉ. ढवळे (नि.क्र.६८) यांच्या साक्षीनुसार, एम.एल.सी. प्रमाणपत्रात जखमेच्या वयाच्या आकड्यावर खाडाखोड (Overwriting)

झालेली आहे, ज्यामुळे वैद्यकीय प्रमाणपत्राच्या (नि.क्र.६९) विश्वासार्हतेला बाधा पोहोचते.

**१३.** अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ व ८ अनुक्रमे डॉ. देसले आणि डॉ. ढवळे या दोन्ही वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उलटतपासणीत अत्यंत महत्त्वाची कबुली दिली आहे की, "जर एखादी व्यक्ती कठीण किंवा खडकाळ पृष्ठभागावर पडली, तर अशा प्रकारच्या जखमा आणि अस्थिभंग होऊ शकतात." या कबुली वरून जखमेचे स्वरूप पाहता पर्यायी शक्यता नाकारता येत नाही.

**१४.** अभियोग्य पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३, ५ आणि ९ अनुक्रमे मनीष मोहिते, रवींद्र मोहिते आणि वैष्णवी यादव–तपासी अंमलदार यांनी मान्य केले आहे की, घटनास्थळाची वाट अत्यंत खडकाळ, डोंगराळ आणि अडगळीची आहे. त्यामुळे खडकाळ वाटेवर पाय घसरून पडल्यामुळे सदर दुखापत झाली असण्याची आरोपीतर्फे उलटतपासणीतील बचाव अधिक संयुक्तीक आणि संभाव्य वाटतो.

**१५.** तथाकथित घटनास्थळाचे ३ फोटो (नि.क्र. ४२ ते ४४) बद्दल तपासणी अंमलदार वैष्णवी यादव मान्य करतात की, त्यामध्ये पंच किंवा फिर्यादी दिसत नाही. या फोटोंचे निरीक्षण केले असता त्यात कुणीही व्यक्ती दिसत नाही. मोघम कुठल्यातरी निर्जन जागेचे हे फोटो दिसत आहेत. त्यात या खटल्याशी संबंधित कुणीही व्यक्ती नाही. स्वतः तपासी अंमलदार किंवा फिर्यादी–सनथ मोहिते सुद्धा नाही. अशा मोघम स्वरूपाच्या फोटोंवर विश्वास ठेवता येणार नाही. तपासी अंमलदार यांना सदरच्या फोटोमध्ये पंच किंवा फिर्यादी यांना सामावून घेण्यासाठी कोणतेही अडचण नसल्याचे ते म्हणतात. अशा परिस्थितीत, तपासी अंमलदार घटनास्थळी गेलेच नव्हते हे दिसते व घटनास्थळ सुद्धा सिद्ध होत नाही, असा निष्कर्ष मी काढत आहे. शिवाय तथाकथित फोटोंसाठी (नि.क्र. ४२ ते ४४) दिलेले प्रमाणपत्र (नि.क्र. ७३) भारतीय पुरावा कायद्याप्रमाणे नसल्यामुळे मी ते पुराव्याकामी स्विकारत नाही.

**१६.** गुन्ह्यात वापरलेली वस्तू (चिव्याचा बांबू–वस्तू क्र.१) जप्त करण्याच्या प्रक्रियेत गंभीर कायदेशीर त्रुटी आढळल्या आहेत, असे दिसते. ज्यामुळे जप्तीची सत्यता नष्ट होते. जप्ती पंचनाम्याचे पंच साक्षीदार प्रदीप कचरे (स.सा.क्र.७) हे पूर्णपणे फितूर झाले आहेत. त्यांनी न्यायालयात प्रतिज्ञापूर्वक सांगितले की, त्यांच्यासमक्ष कोणतीही काठी जप्त करण्यात आलेली नाही आणि पोलिसांनी केवळ कागदावर सह्या घेतल्या होत्या. तथाकथित जप्त केलेल्या चिव्याच्या बांबूच्या लेबलवरील स्वाक्षरीतील तफावत सुद्धा अभियोग पक्षाची केस कमकुवत करते. तपास अधिकारी वैष्णवी यादव यांच्या उलटतपासणीत उघड झाले की, जप्त केलेल्या काठीच्या (मुद्देमाल वस्तू क्र.१) लेबलवर 'प. रा. पवार' नामक व्यक्तीची स्वाक्षरी आहे, ज्यांचा या केसशी कोणताही संबंध नाही; तर जप्ती पंचनाम्यावर (नि.७१) पंच म्हणून प्रदीप कचरे यांचे नाव आहे. हा विरोधाभास स्पष्ट करतो की, जप्तीची प्रक्रिया संशयास्पद आणि केवळ कार्यालयीन स्तरावर केलेली आहे.

**१७.** समोर आलेल्या पुराव्याचे सांगोपांग समालोचन केले असता असे स्पष्ट होते की, केवळ संशयाच्या आधारे आरोपींना दोषी ठरवता येणार नाही. संशय कितीही बळकट असला तरी तो पुराव्याची जागा घेऊ शकत नाही. सबब, प्रस्तुत प्रकरणात गुन्ह्यामागे कौटुंबिक जमिनीच्या वादाचे पूर्ववैमनस्य स्पष्ट आहे. घटनास्थळावरील स्वतंत्र साक्षीदार वासुदेव गावडे (गुराखी) तपासात टाळले गेले आहेत. वैद्यकीय पुराव्यानुसार, दुखापत ही मारहाणीपेक्षा खडकाळ जमिनीवर पडल्यामुळे होण्याची शक्यता जास्त आहे. काठी जप्तीचा पंचनामा अत्यंत दोषपूर्ण आणि संशयास्पद आहे. घटनास्थळ सिध्द झालेले नाही.

**१८.** परिणामी, अभियोग पक्ष आरोपींवरील भारंतीय दंड संहिता कलम ३२५, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये असलेले आरोप वाजवी संशयाच्या पलीकडे सिद्ध करण्यात पूर्णपणे अपयशी ठरला आहे. कायद्याच्या प्रस्थापित तत्त्वानुसार संशयाचा फायदा आरोपींना मिळणे न्यायोचित आहे. म्हणून मी प्रश्न क्रमांक १ ते ५ साठी नकारार्थी उत्तर देत आहे.

**<u>प्रश्न क्रमांक ६ बाबत</u> : –**

**१९.** आरोपींचे विरुद्धचा दोषारोप संशयापलीकडे शाबीत करण्याइतपत सबळ पुरावा अभियोग पक्षाने न्यायालयासमोर आणलेला नाही. या कारणास्तव, आरोपींना भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२५, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये दंडनीय अपराधातून निर्दोष मुक्त करणे क्रमप्राप्त आहे. वर नमूद कारणास्तव, प्रश्न क्रमांक ६ च्या अनुषंगाने, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

**१.** आरोपी क्रमांक १ ते ४ यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) प्रमाणे, भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२५, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यांच्या आरोपांतून, निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपींचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येतात. त्यांना मुक्त करण्यात येते.

**३.** अपिलाचा कालावधी संपल्यानंतर, जप्त मुद्देमाल म्हणजेच काठी ही मुल्यहीन असल्याने ती नाश करण्यात यावी.

**४.** आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ अन्वये जामिन कदब्याची पुर्तता करावी.

**५.** या न्यायनिर्णयाची माहिति ना.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील फौजदारी अपिल एस.टी.क्र.३९०/२०१९ च्या न्यायनिर्णयातील निर्देशानुसार जिल्हादंडाधिकारी, रत्नागिरी यांना कळविण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SUNAYANA SACHINKUMAR PINGALE
Date: 2026.06.10 16:55:19 +0530

ठिकाण – रत्नागिरी. ( श्रीम.एस.एस.पिंगळे )
दिनांक – १०/०६/२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.

## -:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file Judgment are same word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.M.Jadhav |
| Court Name | :- | The Court of Chief Judicial Magistrate, Ratnagiri |
| Date of decision | :- | 10/06/2026 |
| Judgment signed by P.O. on | :- | 10/06/2026 |
| Judgment uploaded on | :- | 10/06/2026 |